प्रिय मित्र,

**'उमेद परिवार' चे शुभचिंतक**

आजकालच्या गतिमान कॉंक्रीटच्या जगातही व्यवहाराच्या कवचाआड, आपण सारे जोपासत असतो.. एक अंतरीचे स्वप्न –

वृक्षासारखं बेबंध मनोमनी फुलण्याचं

निसर्गाशी समरस होऊन दातृत्वातून बहरण्याचं, हे साकार करण्यासाठी,

तुमच्या मदतीच्या हस्तस्पर्शानं,

आणि तुमच्या आप्त–स्वकीयांच्या स्मतिसाक्षीनं आम्ही सादर करीत आहोत –

'चैत्रबन' ... तुमच्या उमेदीचं... उमेदसाठी!.

उमेद परिवारच्या मतिमंद आणि बहुविकलांग मुलांच्या पुनर्वसन व व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी परिवारच्या 'वडकीनाला' जागेत (कानिफनाथ व मस्तानी तलावासाठी प्रसिध्द) निसर्गाच्या सान्निध्यात अन् प्रदूषण मुक्त वातावरणात 'अरविंद सौरभ' वसविण्यात येणार आहे.

याभोवती असलेल्या जागेत हिरव्यागार वृक्षवेलींनी बहरलेली 'चैत्रबन' फुलविण्याची योजना उमेद परिवारने आखली आहे.

**भूतभविष्यांच्या स्मृतिवृक्षांची**
**लाविता रोपे 'चैत्रबनी'**
**मुला-फुलांचा वर्तमान हा**
**जगत खुलावा बहरातुनी**

आपण आपल्या आप्त–प्रिय व्यक्तीच्या स्मृतिप्रित्यर्थ, वाढदिवसा निमित्त वा मैत्रीखातर एक रोप दत्तक घ्यावे...त्या नावाने त्याचा वृक्ष वाढविण्याचा पूर्ण प्रयत्न उमेद परिवार जबाबदारीने करेल.

आपण आपल्या प्रिय व्यक्तीचे नाव व स्मृती निसर्गात 'वृक्षरूपाने' बहरतच राहील चिरंतनपणे.. अन् तुमच्या अंतरी असेल 'उमेद' च्या मुलांना फुलवण्याचे माध्यम बनल्याचे सहृदय समाधान !

यासाठी आपण सोबतचा फॉर्म भरून प्रिय व्यक्तिच्या नावाने रू. १००० पाठवावेत. आपल्या आजपर्यंच्या सहकार्याप्रमाणेच या उपक्रमाने उमेद परिवारला आपल्या अखंड साथीची नवी उमेद मिळत राहील.

आपल्या सहृदयतेबद्दल आभार.

उमेद परिवार

# होय

**मला मदत करायला आवडेल**
**१००० रू. प्रत्येक वृक्षाकरीता**

झाडे ________ रक्कम ________

रोख / चेक नं. दि.

बँकेचे नाव : ____________________

नाव : ____________________

____________________

पत्ता : ____________________

____________________

____________________

____________ पिनकोड : ____________

वाढदिवस : ____________________

व्यवसाय : ____________________

पत्ता : ____________________

____________________

____________________

____________________

फोन : निवास ऑफिस

मोबाईल :

इ–मेल :

____________________

यांच्या स्मृतिप्रित्यर्थ / वाढदिवसानिमित्त

दिनांक

सही ____________

कृपया आपले चेक्स व देणगी 'उमेद परिवार'च्या नावे पाठवा.
उमेद परिवार ला दिलेल्या देणग्या
आय.टी. ॲक्ट १९६४ अन्वये सेक्शन ८०जी अंतर्गत
कर माफीस पात्र आहे.

## संस्थेची उद्दिष्टे :

* मतिमंद आणि बहुविकलांगांचे पुनर्वसन करणे.
* त्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि वैद्यकीय उपचारांसाठी मार्गदर्शन व साहाय्य करणे.
* शैक्षणिक केंद्र व प्रशिक्षण केंद्र चालवणे.
* विशेष शाळांतून कार्य करणाऱ्या शिक्षक व कार्यकर्त्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविणे.
* व्यवसाय-प्रशिक्षण केंद्र चालविणे, उदयोग व्यवसायासाठी आवश्यक कौशल्ये देण्याचा प्रयत्न करणे.
* वैद्यकीय उपचारांसाठी थेरपी – उपचार केंद्र चालविणे, वैद्यकीय मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देणे, वैद्यकीय शिबिरे आयोजित करून पालकांना मार्गदर्शन करणे. शाळेत जाऊ न शकणाऱ्या मुलांसाठी संगोपन केंद्र (Day Care Center) चालविणे. सुट्टीत शिबिरे व निवासी शिबिरे आयोजित करणे.
* पालकांच्या पश्चात अशा व्यक्तींचा संभाळ करण्यासाठी, त्यांच्या पुनर्वसनासाठी एखादा शेती प्रकल्प चालविणे.
* ह्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या राज्यातील, देशातील, आणि जगातील संस्थांशी संपर्क ठेवून परस्परांच्या कार्याचा परिचय करून घेणे विचार व अनुभवांची देवाणघेवाण करणे.
* पालकांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांच्या नियमित सभा, मेळावे, संमेलने घेऊन विविध उपक्रम राबविणे.
* राज्यस्तरावरील या कार्याचे संयोजन करणे, जिल्हा स्तरावरील या कार्याला चालना देणे. राज्यात जिल्हास्तरावर पालक-संघटना तयार होण्यासाठी प्रोत्साहन देणे व मार्गदर्शन करणे.
* राज्य व विभागीय स्तरावर परिषद, शैक्षणिक उपक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रशिक्षण, स्पर्धा घेऊन या कार्याला पोषक असे वातावरण तयार करणे. संशोधन करणे, साहित्य प्रकाशित करणे, प्रसार करणे, नियतकालिक चालविणे

* सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी क्र. एफ / ५९३४/८९/पुणे
संस्था नोंदणी क्र. महाराष्ट्र /४८४२/८९, पुणे
आयकर ८० - जी IV/Tech/80G/85/2010-11

उमेदशी स्नेह जोडा - नाते जोडा

उमेद परिवार

मतिमंद - बहुविकलांगांच्या पालकांची संस्था
शांती कॉम्प्लेक्स फ्लॅट नं. ४, दुसरा मजला,
४२८ बी, नवी मंगळवार पेठ, नरपतगीरी चौक,
पुणे - ४११ ०११ (इंडिया) फोन : ०२० - २६१४०४५६

व्यक्तित्वाचे रंग
खुलावे
'उमेद'च्या
मूलपाखरांचे...
वृक्ष सावलीतून
घडवावे
स्वप्नपंख भरारीचे..

उमेद परिवार